महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेलः roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/८७१
दिनांक : १४/०३/२०२०

प्रति,
प्राचार्य/संचालक,
औरंगाबाद विभागांतर्गत असलेल्या सर्व व्यावसायीक
अभ्यासक्रमाच्या संस्था (पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी)

विषय :- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.
संदर्भः-१. शासन पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. करोना-२०२०/प.क्र.५८/आरोग्य ५, दि.१४/०३/२०२०
२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(४०९/२०)/तांशि-१, दि.१४/०३/२०२०
३. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२०/१४८, दि.१४/०३/२०२०

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यानुसार करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सर्व महानगरपालिका, नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालय व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधिल तरतुदी नुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधीन ०१ च्या शासन पत्रान्वये सुचित केलेले आहे.

तथापी या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्याक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सुचना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने उपरोक्त सुचना विचारात घेऊन या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायीक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवाव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(महेश द. शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत – १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना सविनय सादर.
२. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव तसेच औरंगाबाद विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायीक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या ई-मेल वर पाठविण्यासाठी.